# महात्मा गांधीजी



[ पोवाडा—पाळणा—आरती वगैरे ]


★

कवि : शाहीर महादेव नारायण नानिवडेकर

★




पुष्प ३७ वें ] संपादक : ग. का. रायकर [ मूल्य चार आणे



महाराष्ट्राचे लाडके
शाहीर

**नानिवडेकर**

म्हणजेच
प्रभावी लेखणी !
खणखणीत वाणी !
व
ढोलक्यांच्या साथीची
अपूर्व जोडणी
यांचा त्रिवेणी संगम

★

## जय हिंद !

शाहीर नानिवडेकर हे महाराष्ट्राचे एक लोकप्रिय शाहीर आहेत. ते डफावर थाप मारून पोवाडे म्हणूं लागले म्हणजे श्रोतृसमुदाय तल्लीन होतो. त्यांची भाषा अगदी सोपी, सुबोध व खेड्यांतील अज्ञ शेतकऱ्यांना सहज समजते. त्यांनीं अनेक राष्ट्रीय पोवाडे केले असून त्यांचा पुस्तकरूपानें सर्वत्र प्रचार होणें अत्यंत आवश्यक आहे असें वाटल्यावरून त्यांच्या प्रकाशनास सुरवात करीत आहों.

पुण्य पिताजी महात्मा गांधी यांच्या वर्षश्राद्धाच्या दिवशीं त्यांना श्रद्धांजलि वाहण्यासाठीं त्यांनीं रचलेला हा गांधीजींचा पोवाडा प्रसिद्ध केला आहे. त्यांचे इतर पोवाडेही क्रमाक्रमानें प्रसिद्ध होतील.

—संपादक

# महात्मा गांधीजी

## [ पोवाडा ]

### शाहिरी नमन ★ ★ ★

मुळारंभीं नमन श्रीगणा । विघ्ननाशना । मंगलकरणा ॥
शारदे काव्यदेवते मती द्यावी कवना ॥ जी ॥
मग नमन हिंदुभू चरणा । पुण्यभू चरणा । मायभू चरणा ॥
महादेव शाहीर करि मुजरा करावी करुणा ॥ जी ॥
मग स्वतंत्र देवीपदा । सकळ तुम्हि वंदा । आपुल्या हिंदा ॥
जिच्यापायीं भोगिल्या हुतात्म्यांनि आपदा ॥ जी ॥
आतां स्मरा क्रांतीकारा । मदनधिंगरा ।
पासुन परंपरा । सुभाषचंद्रा ॥
देशापायीं आत्मबलिदान केलें त्या वीरां ॥ जी ॥
आतां राष्ट्रसभा कॉंग्रेस । तारक आपणांस । वंद्य सकलांस ॥
झगडली स्वराज्यासाठीं खडा इतिहास ॥ जी ॥
लोकमान्य टिकळांपासून । गांधी मोहन ।
एकेक रत्न । अमोलिक रत्न ॥
सारीं लेकरं लाडकी राष्ट्राची कसा मी विसरेन ॥ जी ॥
स्वातंत्र्य-देविचे भक्त । जाहीर प्रख्यात । कुणी अज्ञात ॥
कुणा कुणा कसा मी वानूं माझ्या कवनांत ॥ जी ॥

मी नाहीं भापापंडित । अजाण शास्त्रांत । वेदापुराणांत ॥
सांप्रतीं रूढ जी बोली धरतो तिचा हात ॥ जी ॥
आतां नर्मान गुणीजन भले । कलगि तुरेवाले ।
तमाशे फडवाले । जातिवंतांना । कलावंतांना ॥
गोंधळ्या डवऱ्यांना । वाघ्या दांगटांना ।
कोल्हाटी भराड्यांना । म्हारामांगांना ॥
ज्यांनीं राखला वंशपरंपरा गायकीचा वाणा ॥ जी ॥

[ चाल ]

तुम्ही सुज्ञ रसिक गुणवंत श्रोते या स्थाना ।
नका शोधूं दोप अवगुण माझिया कवना ।
महादेव कविचं हृद्गत अंतरीं जाणा ।
अज्ञांसी द्याया शिक्षण । फेटा बांधुन ।
डफ तुणतुणं । धरलं या क्षणा ॥ जी ॥

★

## चौक १ ला ★ ★ बाळपण व शिक्षण

त्रिभुवनीं शांति निर्मिता । वंद्य भारता । बापुजी पिता ।
महात्मा गांधी अमर झाला ॥ अलौकिक ज्याच्या चरितलीला ;
अर्पू श्रद्धांजलि चरणाला ॥ जी ॥
शके सतराशें नव्वदासी । वद्य चतुर्दशी । भाद्रपद मासीं ।
जन्मला मोहनदास पुत्र ॥ आनंदली पुतळाबाई माता ।
करमचंद पिता । आनंदलें सारें पोरबंदर ॥ जी ॥



( पाळणा )

बाळा जो जो रे मन 'मनमोहना' । सुखवी जन कामना ॥ जो जो ॥
जन्म शुभ दिवशीं । तूं घेशी । भारतीं धन्य होशी ॥ जो जो ॥
उजळाया स्वकुळा । वेल्हाळा । सांगी माता पुतळा ॥ जो जो ॥
पितरांच्या आशा । आकांक्षा । पुरवी मोहनदासा ॥ जो जो ॥

( चाल : पोवाडा )

टाकिलं लग्न उरकून । पुतळा मातेनं । मोठ्या ममतेनं ।
बारावं वर्स मोहनाला ॥ तेंच वयमान कस्तूरीला ।
मोहन कस्तुरी जोडा शोभला ॥ जी ॥
सामान्य साधं बाळपण । विशेष नाहीं गुण । तशांत
दुर्व्यसन । मांस भक्षण सुरू केलें ॥ परी वेळेवर सावध झाले ।
सदाचारानं वागुं लागले ॥ जी ॥
झाले मॅट्रिक शिक्षण पुढें । विलायतेकडे । शिकावे धडे ।
बॅरिस्टरी घ्यावं श्रेष्ठ ज्ञान ॥ बेत केला पुतळा मातेनं ।
बोटीवर चढला तरुण मोहन ॥ जी ॥
बाळा मांसाहार करूं नको । दारू पिऊं नको । परस्त्री
नको । सांभाळुन वाग परदेशांत ॥ शब्द मातेचे ठेव हृदयांत ।
गवसूं नको कंच्या मोहपाशांत ॥ जी ॥
आला आला मोहनदास आला । मायदेशाला । बॅरिस्टर
झाला । मातेचा पांग फेडण्याला ॥ आनंदानं घरांत पाय
ठेवला । कळलं त्याला माय गेली स्वर्गाला ॥ जी ॥

( चाल )

आईच्या दुःखामुळं आधींच वेडापिसा ॥ जी ॥
इतक्यांत टाकिला आप्तजनांनीं फांसा ॥ जी

परदेश-गमन्याला पातकाचा वारसा ॥ जी ॥
जर घेशिल प्रायश्चित्त शुद्ध तूं खासा ॥ जी ॥
नरसिंह गांधी झाला रूढी-पुढती ससा ॥ जी ॥

( चाल )

केलं स्नान रामकुंडांत । नाशिक तीर्थांत, झाला शुचिर्भूत ।
मोहनदास प्राप्त प्रसंगाला ॥ अलौकिक ज्याच्या चरितलीला ।
अर्पू श्रद्धांजलि चरणाला ॥ जी ॥

## चौक २ रा ★ ★ आफ्रिकेंतील कामगिरी

थाटलं बिऱ्हाड मुंबईला । धंदा सुरू केला । वकिलीचा आपला । खऱ्याची बाजू गांधी धरणार ॥ खोटा पक्षकार नको म्हणणार । सांगा मग पैसा कसा मिळणार ॥ जी ॥ मग त्यांच्या वडील बंधून । दिला गांठुन । पक्षकार छान । शेट अबदुल्ला आफ्रिकेचा ॥ गांधींनीं घेऊन खटला त्याचा । धरीला मार्ग आफ्रिकेचा ॥ जी ॥

( चाल )

आफ्रीकेला नाताळांत प्रमुख दरबान शहर ॥ जी ॥
त्या ठायीं पोंचले गांधी बॅरिस्टर ॥ जी ॥
कज्जाचे सारे जुळविले कागद पत्र ॥ जी ॥
गेले कोर्टांत ऐटींत पगडी डोक्यावर ॥ जी ॥
मॅजिस्ट्रेट बोलले, आधीं पगडी खालीं ऊतर ॥ जी ॥
आला स्वाभिमान गांधींचा उफाळुन वर ॥ जी ॥
'नाहीं पगडी खालिं काढणार' केलं उत्तर ॥ जी ॥
ऐकतां काढलं हांकलून कोर्टाबाहेर ॥ जी ॥



( चाल )

बैसतां रेलवे गाडींत । पहिल्या वर्गांत । ट्रान्सव्हालांत । निघाले जाया प्रिटोरियाला ॥ रेलवे अधिकारी गरम झाला ॥ काळा म्हणुन छळ सुरू केला । बाहेर ढकलीला । फरफटत नेला । गांधी प्रवाशाला ॥ जी ॥

( चाल )

गोऱ्याच्या जोडीला काळा । पाहवेना दृश्य त्या डोळां ॥ जी ॥
गोऱ्यांना रस्ता मोकळा । काळ्यांना सदा अडथळा ॥ जी ॥
तीन पौंड कर आगळा । नाहीं सीमा काळ्यांच्या छळा ॥ जी ॥

( चाल )

सारे सहन केले अपमान । गांधी वकिलानं । शांत चित्तानं । मीमांसा केली अपुल्या चित्तांत । एकीचा अभाव हिंदी लोकांत । कां न मग व्हावा आपुला घात ॥ जी ॥

( चाल )

एक वर्स कष्ट सोसुन । खटल्याचं काम उरकुन ।
दिला छान समेट घडवुन । गांधीजी निघाले परतुन ।

( चाल )

नका जाऊं भाई गांधीजी आम्हां सोडून ॥ जी ॥
क्रूर गोरें सरकार छळिल खवळुन ॥ जी ॥
मग आमच्या छळाला वाचा फोडील कोण ॥ जी ॥

( चाल )

ऐकतां आलि करुणा । त्या दयाळु गांधीजींना ।
केलं शांत हिंदि लोकांना ।
वाटला थोर आधार गांधी सकलांना ॥ जी ॥

( चाल )

स्थापिली हिंदी कॉंग्रेस। नाताळास। ठेवा स्मरणास। झुंज द्यावया सरकाराला ॥ अलौकिक ज्याच्या चरितलीला। अर्पू श्रद्धांजलि चरणाला ॥ जी ॥

## चौक ३ रा ★ ★ आफ्रिकेंतील विजय

आफ्रीकेची करुणा काहणी। देशीं जाउनी। कथन केली त्यांनीं। पुढाऱ्यांना कळविली हकीगत॥ लोकमत करुनी जागृत। गेले पुन्हा परत आफ्रीकेंत ॥ जी ॥

किनाऱ्यावर गांधी उतरले। गोरे खवळले। चवताळुन गेले। मारुनी केलं त्यांना घायाळ॥ देह गांधींचा रक्तबंबाळ। सुदैवानं जगले न्हवता आला काळ ॥ जी ॥

जाणुनी माणुसकीला। सहाय्य इंग्रजाला। केलं त्या काला। सुश्रुशा पथक उभारून। बोअर युद्धांत जखमी सैन्य। सेवुनी जाहले गांधी धन्य ॥ जी ॥

( चाल )

कृतज्ञता तेंव्हां आठवली सरकाराला ॥ जी ॥
केलें सुवर्णपदक अर्पण गांधीजीला ॥ जी ॥
दिलें वचन वागवूं नीट हिंदी लोकांला ॥ जी ॥
एकतां गांधि गेले परत मायदेशाला ॥ जी ॥

( चाल )

सरकारानं वचन मोडून। हिंदीजन केले हैराण।
नागरीक हक्क बुडवुन। तीन पौंड कर बसवुन।



( चाल )

एकतां गांधी सहाय्याला झणीं धांवला ॥ जी ॥
सवें पत्निहीं नेली कस्तुरी आफ्रिकेला ॥ जी ॥

( चाल )

वकिलाचा बनला शेतकरी। कष्ट बहु करी। नांगर धरी। फिनिक्सच्या अपुल्या शेतांत ॥ छानदार घर। करून तेथ। राहिला साधे धडे गिरवीत ॥ जी ॥

परि अघटित विधिघटना। घडली त्या क्षणा। हिंदवी जनां। पीडा केली तिथल्या सरकारानं॥ नागरीक हक्क हिरावून। सक्तिनें घेतले आंगठे उठवून ॥ जी ॥

असले जुलमी कायदे मोडण्याला। गांधी पुढें झाला। प्रतिकार केला। सत्याग्रह बघा हाच पहिला ॥ गांधींना बंदिवान केला। सत्याग्रही नेले तुरुंगाला ॥ जी ॥

शिक्षा भोगुन सुटतां क्षणीं। पुन्हां खवळुनी। अधिक जोरांनीं। पाजळलं सत्याग्रह हत्यार। नमविलं आफ्रिकेचं सरकार। गांधीच्या गळां विजयाचा हार ॥ जी ॥

मग आले मायदेशाला। सेवा करण्याला। आश्रम स्थापीला। साबरमती नदीच्या तीराला ॥ अलौकिक गांधी चरितलीला अर्पू श्रद्धांजलि चरणाला ॥ जी ॥

卐

## चौक ४ था ★ ★ विधायक चळवळ

प्रवास केला हिंदुस्थानभरी रेलवेनं। मुद्दाम तिसऱ्या वर्गानं। केलें अवलोकन। गोरगरीब कसे वागती ॥ घेतली समजुन सद्यस्थिती ॥ जी ॥

चंपारणीं मजूरांना गोरे मळेवाले । मारूं झोडूं लागले । गांधी धांवुनी गेले । अन्यायाचं कराया निरसन ॥ अनाथांचं केलं रक्षण ॥ जी ॥

सरकारनं रौलेट कायदा बनविला । गुन्हावीण कैकांला । ठेवलं डांबून तुरुंगाला । सत्याग्रही गांधी खवळला ॥ निषेधाचा भडीमार केला ॥ जी ॥

निषेधाच्या हरताळाच्या सभा मुंबईला । दिल्ली अमृतसरला । तिथं गोळीबार केला । निरपराधी रयत मारीला ॥ नका विसरूं जालीयनवाला ॥ जी ॥

फरफटत चालवाया लावलं रस्त्याच्यावरनं । बायका करून नग्न । वर फटके मारून । हर्षला डायर जनरल । कोण त्याला जिवंत टेवील ।

( चाल )

कॉंग्रेसनं स्वराज्य ध्येय करुन मुक्रर ॥ जी ॥
बहिष्कार कोर्ट कौन्सील कॉलेजावर ॥ जी ॥
देशभक्तीनं पडले विद्यार्थी बाहेर ॥ जी ॥
देशासाठीं नेहरू जयकर बनले फकीर ॥ जी ॥
जमविला टिळक फंड कोटिच्या वर ॥ जी ॥
परदेशी कापडाच्या होळ्या पेटल्या भरभर ॥ जी ॥
काळ्या बावट्यानं केला युवराजाचा सत्कार ॥ जी ॥
सायमन कमिशनबरोबर असहकार ॥ जी ॥

( चाल )

एकवीस दिवस केलें उपोषण । हिंदु मुसलमान । एक व्हावे



म्हणुन । आत्मशुद्धीचा मार्ग धरिला ॥ अलौकिक गांधी चरितलीला । अर्पूं श्रद्धांजलि चरणाला ॥ जी ॥

## चौक ५ वा ★ ★ ★ सत्याग्रह

वार्डोलीला सारा वाढविला । जुलुम चालविला । अशा समयाला । झुंजाया निघे पटेल सरदार ॥ घेउनी किसानांचा कैवार । जेर करी सैतानी सरकार ॥ जी ॥

( चाल )

नका देऊं फुटकी कवडी करा निर्धार ॥ किती वेळ टिकाव धरिल पाहूं सरकार ॥ न्यायाचि असुन मागणी आमची साचार ॥ नाहीं पर्वा करित सरकार । गर्व त्या फार । करूं बेजार । आम्ही झुंजार ॥ जी ॥

जगतसे राज्य अम्हांवर । तुम्हा अम्हां शेतकऱ्यांवर ।
जर बिघडेल हा व्यवहार । राज्ययंत्र नाहीं चालणार ।
तर उठा चला सत्याग्रह लढवूं आतां ॥ जी ॥
आशिर्वाद गांधी गुरुजींचा तुम्हाला पुरता ॥ जी ॥
गुजराथी वीर झाले सज्ज ऐकुनी वार्ता ॥ जी ॥

( चाल )

एकीचा किल्ला मजबूत । अहिंसेची ढाल हातांत ।
सत्याग्रह खड्ग फिरवीत । जुलमाचे घाव झेलीत ।
अन्यायाचा नाश करूं रणांगणामधीं पुरता ॥ जी ॥

(चाल)

सरकाराची पाशवी शक्ती । जुलुम जबरदस्ती । कपट भेद-नीती । सत्याग्रहापुढती फिकी पडली । म्हणुन सारावाढ बंद केली ॥ बार्डोली विजयशिखरीं चढली ॥ जी ॥

स्वातंत्र्याचा ठराव जाहीर । करी जवाहर । अध्यक्ष खंबीर । लाहोरच्या अधिवेशनाला ॥ सव्वीस जानेवारीला दिवस ठरला ॥ हाच स्वातंत्र्यदीन पहिला ॥ जी ॥

स्वातंत्र्य घेतल्याविना । येणार नाहीं पुन्हां । करूनी घोषणा । निघाले गांधीजी दांडीला ॥ एकुण ऐशीं वीर संगतीला । प्रतिज्ञा केवढी घोर बोला ॥ जी ॥

(चाल)

कृश तनू कांति गोमटी । हो । परि सदा हांसरी मुखवटी ॥ जी ॥
केशरी टिळा ललाटीं । हो । हातांत अहिंसा काठी ॥ जी ॥
उपासानं शरीर जरी कष्टी । हो । झगडाया शक्ति परि मोठी ॥ जी ॥
पंचानें (अहो खादीनें) झांकिली कटी । हो । स्वराज्याच्या सदा खटपटी ॥ जी ॥

(चाल)

सव्वाशें कोस चालले । दांडीला आले । मीठ गोळा केले । कायदेभंगाची मारिली लाथ ॥ भडकला वणवा उभ्या देशांत । सरकाराच्या धडकी भरली हृदयांत ॥ जी ॥

जर एक पुढारी पकडला । त्याच्या ठिकाणाला । शेंकडो धडकला । आलं सरकार मेटाकुटिला ॥ लाठीमार करून पोलीस थकला । मार्शल कायदा कैक नगराला ॥ जी ॥



(चाल)

स्वयंसेवक छातिचे निधडे । किती गावे त्यांचे पोवाडे ॥ जी ॥
अंगावरी घातले जरि घोडे । तरि अचल मेरुवत् खडे ॥ जी ॥
केशरी पातळ नेसुनी जाडे । स्त्रिया हंसत सगळ्यांच्या पुढें ॥ जी ॥
मस्तकीं लाठीमार पडे । परि निशाण हातामधीं खडे ॥ जी ॥

(चाल)

मेंदुची शक्ती सरकारी सारी संपली ॥ जी ॥
मध्यस्ति सप्रु जयकरांचि सुरवात झाली ॥ जी ॥
तुरुंगांत गांधी-नेहरूंची भेट करविली ॥ जी ॥
गांधींनी पूर्ण स्वातंत्र्य मागणी केली ॥ जी ॥
व्हॉईसराय-गांधी-समेटाची बोलणी सुरू झाली ॥ जी ॥
गोलमेज परिषद लंडनांत भरविली ॥ जी ॥

(चाल)

गांधींना बोलावणें आलें । बादशहाचें भलें । म्हणोनी गेले । भेटले खादी-पंचा नेसून । शब्द नाहीं बोलले धरलें मौन । बादशाहाचा झाला थोर अपमान ॥ जी ॥

गोलसभा निष्फळ झाली । फुकट वेळ गेली । परतुनी आली । पुढारी मंडळी मायदेशीं ॥ परी सरकार दूरदर्शी । अटक करी सर्व पुढाऱ्यांसी ॥ जी ॥

जातिनिर्णय हूल दावून । ऐक्याचा खून । केला सरकारानं । ऐकतां गांधी दुःखी झाले । हरीजन हिंदुपासून फुटले । प्राणांतिक उपवास केले ॥ जी ॥

वटणीला आणलं सरकार। येरवडा करार। मान्य केल्यावर। गांधींनी उपास सोडीला॥ अलौकिक ज्याच्या चरितलीला। अर्पू श्रद्धांजलि चरणाला॥ जी॥

★

## चौक ६ वा ★ ★ काँग्रेसचीं मंत्रि-मंडळें

काँग्रेसचीं मंत्री-मंडळं होतीं त्या सालीं॥ जी॥
परी पुढं महायुद्धाची खाई पेटली॥ जी॥
इंग्रजाची जपान जर्मनानं त्रेधा उडाविली॥ जी॥
हिंदुस्तानापुढं इंग्राजानं करुणा भाकली॥ जी॥
करा सहाय्य अम्हां देऊं स्वराज्य पुढच्या सालीं॥ जी॥
संमतीविना प्रजा युद्धामधें खेंचिली॥ जी॥
पाहतां गांधींनी आज्ञा काय सोडली॥ जी॥
टाका मोडुन मंत्री-मंडळं चला या खालीं॥ जी॥

(चाल)

देऊं लढा जगण्या मरण्याचा। अखेर निर्वाणीचा। सत्य ही वाचा। इंग्रजाला हांकलुया देशापार॥ वीर हो मर्द तुम्ही झुंजार। करा मायभूचा जयजयकार॥ जी॥

झाला जागा हिंदीजन गांधीजीच्या मंत्रानं॥ जी॥
जाती धर्म भेद मिटविले ऐक्य बोधून॥ जी॥
अस्पृश्य उच्चपदीं नेले केले हरिजन॥ जी॥
दिला चरखा किसानां हातीं सुदर्शन॥ जी॥
सत्याग्रह शस्त्र दुबळ्यांना झालं तारण॥ जी॥
उभविला तिरंगी झेंडा चाळीस कोटींनं॥ जी॥



दादांनो ठेवा मन शांत। जोडितो हात। पुढील वृत्तांत। वर्णितो पुढच्या चौकाला॥ अलौकिक ज्याच्या चरित-लीला। अर्पू श्रद्धांजलि चरणाला॥ जी॥

## चौक ७ वा ★ ★ बेचाळीसची क्रांति

आठ ऑगस्ट बेचाळीसला। चले जाव केला। परकी सत्तेला। देशभर पुढारी पकडीले॥ इंग्रजानं पुढारी पकडीले। जमतेनें शिंग फुंकियेले। घरोघर समर झुंजवीले॥ जी॥

(चाल-गेला दर्यापार)

गोऱ्यांनो पोंचा दर्यापार॥
दीर्घकाल सहवास भोंवला, किती केले उपकार॥ धृ०॥
नको नको त्या जुन्या आठवणी। सूडानें ये हृदय भरोनी।
जालीयनवाला बाग प्रकरणीं। किती केला संहार॥ १॥
स्वदेशप्रीति गुन्हा ठरवुनी पुढारी कारागृहीं डांबुनी।
निर्दयतेनें फांशी चढवुनी। नाहक करितां ठार॥ २॥
स्वराज्य देतों वदतां वचनें। वाटाघाटी मधुर भाषणें।
अंतरीं कपटी कारस्थानें। कुणास ना कळणार॥ ३॥
चिथवुनी द्याव्या जाती जाती। संस्थानिक ते घ्यावे हातीं।
भेदनीतीच्या उभवुनी भिंती। त्यामागें लपणार॥ ४॥
राष्ट्रसभा काँग्रेस माउली। तिरंगी झेंड्यासवें धांवली।
जनता सारी खवळून उठली। स्वतंत्रता घेणार॥ ५॥
स्वातंत्र्याचें शिंग वाजलें। उचला झटपट आतां पाऊलें।
स्वर्गीं हुतात्मे गोळा झाले। करिती जयजयकार॥ ६॥

( चाल-पोवाडा )

ध्वज तिरंगी चढला वर, क्रांतीचा जोर, इंग्रज बेजार ।
मिलीटरी धाक दावी सकला ॥ भूमीगत भुयारांत लढला ।
लष्कराचा टाका ढिला केला ॥ जी ॥
सारीं खेडीं खवळुन उठली । भूमीगत साऱ्या हालचाली ॥ जी ॥
तार तोडली रेलवे उखडली । पगाराची ट्रेन कीहो लुटली ॥ जी ॥
साताऱ्यानं बहादुरी केली । स्वतंत्रता जाहीर केली ॥ जी ॥
ग्रामराज्यें स्थापन केली । सत्ता साहेबाची नष्ट झाली ॥ जी ॥
नाविकांनीं बंडाळी केली । बाहेर सुभाष गस्ता घाली ॥ जी ॥
जर्मनानं मानगुटी धरली । जपान्यानं टांग चढविली ॥ जी ॥
अशी वेळ साहेबावर आली । समेटाची बोलणी सुरू झाली ॥ जी ॥
वाटाघाटी वाद जिंकिले । गांधीजी भले । घेउनी आले ।
हंगामी राज्य भारताला ॥ अलौकिक गांधी चरित-लीला ॥
अर्पूं श्रद्धांजलि चरणाला ॥ जी ॥

## चौक ८ वा ★ ★ ★ हंगामी सरकार

[ लावणी ]

अग सवराज्य आलंया हाता ।
आतां कारभारनी ॥ कशाची चिंता ॥ ध्रु० ॥
एकोणिशें ग सेचाळीसाला । सप्टेंबरच्या ग दोन तारखेला ।
दीस सोन्याचा आपल्या देशाला । रामराज्याचा रवी उदेला ।
राजा इंग्रज उदार झाला । सत्ता वहाल करतो आपनाला ।
गांधी नेहरूच्या यश आलं हाता ॥
आतां कारभारनी कशाची चिंता ॥ १ ॥



चला साहेबाला पोंचवाया जाऊं । आदर सत्कार सन्मान दावूं ।
हात हालवून नीरोप देऊं । हिंदी सद्भाव दावूंया जगता ॥ २ ॥
ऐक कॉंग्रेसनं काय काय केलं । शांति अहिंसा मंत्र पढविलं ।
हिंदुमुस्लीम ऐक्य घडविलं । लोण खेड्यांत घरुघर भिडविलं ।
युक्ती युक्तीनं पाऊल चढविलं ॥ बसली घेऊन हंगामी सत्ता ॥ ३ ॥
होईल आबादी आबाद सर्वत्र । नाहीं घडायाची ऊपास मार ।
रेशन कंट्रोल बघ ऊठनार । अन्नवस्त्राची होईल सुबत्ता ॥ ४ ॥
दंग्याधोप्याची नाहीं आतां धास्ती ।
संपविघ्नांची अडणूक जास्ती ।
सुऱ्यामाराची चालूंया चलती । गुंड मवाली घालीत भीती ।
देशद्रोह्यांना चारूं ग माती । गुंड कायद्याच्या घालूनी लाथा ॥ ५ ॥
गाऊं स्वतंत्रतेचे पोवाडे । मोठ्या देशाच्या भक्तांच्या पुढें ।
जे ग उदार कर्णाच्या एवढे । मला बांधून देतील वाडे ।
मग पडेल कां पोटाचे कोडे ? । शाहीराची तूं शाहाणी ग कांता ॥ ६ ॥

( चाल-पोवाडा )

पंधरा ऑगस्ट सत्तेचाळीस । सुवर्ण दीस । आपल्या भारतास । स्वतंत्र हिंद देश झाला ॥ अलौकिक ज्याच्या चरितलीला । अर्पूं श्रद्धांजलि चरणाला ॥ जी ॥

★

## चौक ९ वा ★ ★ ★ प्रयाण

( चाल १—नाखवा वल्हव ० )

रणपटुधीरा । भारतवीरा । हुशार हुशार ॥ ध्रु० ॥
अखंड राष्ट्राचा निरुपाये भंग ।
शेजारी भाई पाकिस्तान चांग ।

नांदवूं प्रेमानें हा अमुचा चंग ।
जातीवादांसी ना देऊं थांग ।
ऐक्य भावना सुखविल अपुणां ॥ हुशार हुशार ॥

( चाल २ )

रणपटुधीरा । भारतवीरा । चाल जरा समजुनी ।
आतां तूं स्वातंत्र्याचा धनी ॥ धृ० ॥
राष्ट्रसभा कॉंग्रेस झगडली ।
थोर थोर नररत्नें लढलीं ।
हुतात्म्यांची किती आहुति पडली ।
जाऊं नको विसरुनी ॥ गड्या रे चाल जरा समजुनी ॥
दुर्दैवानें देश भंगला ।
नौखालीमधीं कहर उसळला ।
शांतीदूत अनवाणी चालला ।
गांधी महात्मा मुनी ॥ गड्या रे चाल जरा समजुनी ॥

( चाल )

भारत सकलांचें । नंदनवन धाम ।
अत्याचारानें । जरि कुणी बेभाम ।
देशध्वंसोनी । वनातिल उद्दाम ।
चातुरिनें जिंकूं । साधुनिया साम ।
नातरि निर्वाणी । चढवूं लगाम ।
खूप रहा समजुनी ॥ गड्या रे चाल जरा समजुनी ॥

( चाल )

परि काळाचा अवचित आला घाला ।
अमुच्यांतुन गांधी गेला ॥ धृ० ॥



जानेवारी तारीख तीस ।
सायंकाळीं साडे पांचास ।
यमराज आले न्यायास ।
गोडसे अभीधान त्यास ।
पिस्तूल उडवी समयास ।
तो शांतीचा मेरू धरणीं पडला ॥
अमुच्यांतुन गांधी गेला ॥
देउनी मंत्र ऐक्याचा ।
महामंत्र विश्वशांतीचा ।
अहिंसेच्या सद्धर्माचा ।
जग चिरकालीं वर्णील ज्याच्या लीला ॥
अमुच्यांतुन गांधी गेला ॥

( चाल–पोवाडा )

असे थोर महात्मा गांधी । शांत मुत्सद्दी । दिल्लीमधीं ।
यमुनातीरीं अमर झाले ॥ स्वर्गी स्वस्थानीं चढुन बसले ॥
विश्व दुःखांत बुडुन गेलें ॥ जी ॥

( चाल )

पुण्य पिताजी गांधी महात्मा अमरपदीं रमला ॥
सुमन फुलांचा हार अर्पूंया पवित्र चरणाला ॥ जी ॥
ज्या साधूची वाणी विश्वा लावितसे छंद ।
ज्याच्या शब्दें सज्जन दुर्जन होती मंत्रमुग्ध ॥ जी ॥
भारत माता परसत्तेतुन मुक्त केली ज्यानें ।
पदकमलावरि सद्भावानें अर्पूंया सुमनें ॥ जी ॥
ऐक्य शांती सत्कार्यीं लाविली सर्व शक्ती ज्यानें ॥
मंत्र अंतरीं तोच धरोनी वागूं प्रेमानें ॥ जी ॥

सत्य अहिंसा अखिल मानवा शांती देईल ॥
सुरलोकामधीं गांधी महात्मा प्रसन्न होईल ॥ जी ॥

( चाल-पोवाडा )

अजि धन्य पंडित जवाहर। पटेल सरदार। प्रधान खंबीर।
गांधीजींचे पराक्रमी हात ॥ हांकीती स्वराज्याचा रथ।
घोडा भरधांव चालला दौडत ॥ जी ॥

सकलांचा हवा सहकार। करीं द्या कर। हिंद सरकार।
करा बलवान प्रसंगाला ॥ कवी महादेव प्रार्थी सकलां।
अर्पूं श्रद्धांजलि चरणाला ॥ जी ॥


★

## जगाचे तीन थोर गुरु

गेल्या अडीच हजार वर्षांत जगाला तीन थोर गुरु लाभले. पहिले गौतमबुद्ध! हे सुमारें २३॥ शें वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांनीं लोकांना अहिंसेचा संदेश दिला. राज्य, वैभव, संपत्ती यांचा त्याग केला. त्यानंतर ४०० वर्षांनीं येशू ख्रिस्त झाले. त्यांनीं जगाला बंधुभाव, सत्य, प्रेम यांचा संदेश दिला. ढोंगी धर्मगुरूंना हें खपलें नाहीं. म्हणून त्यांनीं न्यायाचा एक फार्स करून त्यांना खुरसावर खिळयांनीं ठोकून मारलें. महात्माजी त्यानंतर दोन हजार वर्षांनीं झाले.त्यांनीं सत्य, अहिंसा, समता, बंधुभाव यांचा संदेश दिला. हीं तत्वें आचरलीं. एवढेंच नाहीं तर त्यांनीं गुलामींत खितपत पडलेल्या हिंदुस्थानला स्वतंत्र केलें.

★

## गांधींचा पाळणा



पुतळामाईच्या पोटीं जन्मला। मोहन गांधी नाम तयाला।
रामचंद्राचा अवतार झाला। करमचंदाला पुत्र तो झाला।
जो जो रे बाळा जो जो ॥ १ ॥
अकरावा अवतार धारण केला। सुदर्शन तें बनवि चरख्याला।
सूत काढुनी दावी जनाला। शांति तत्वाचा मुगुट चढविला।
जो जो रे बाळा जो जो ॥ २ ॥
पहिल्या अवतारीं लढाई झाली। सेना वानराची तयानें केली।
लंकादहन हनुमंतें केली। सीतामाईची मुक्तता झाली।
जो जो रे बाळा जो जो ॥ ३ ॥
दुसऱ्या अवतारीं गोकुळीं आला। पापी कंसाचा संहार केला।
दहीं दूधाच्या चोऱ्या तूं केल्या॥गोप्या गोपींना वेड्या बनवील्या।
जो जो रे बाळा जो जो ॥ ४ ॥
नाना रीतीचे दश अवतारी रे। सर्व जनाला आहे ठाऊक रे।
तैसाचि घेई अवतार आजला। अकरावी संख्या लागे तयाला।
जो जो रे बाळा जो जो ॥ ५ ॥
जैसा शिवबा जिजा मातेला। मातृभूमीची सेवा करण्याला।
पोरबंदरीं जन्मासी आला। पुत्ररत्न तो पुतळीसी झाला।
जो जो रे बाळा जो जो ॥ ६ ॥
पंच पुत्र ते पंडु राजाचे। नांव पांडव पडलें जयाचें।
भारतभूमीचें पुत्ररत्न तें। पुनरपि उपजे कलियुगातें।
जो जो रे बाळा जो जो ॥ ७ ॥

जवाहीर ते अर्जुन झाले । वल्लभभाई ते भीमची बनले ।
राजगोपाळाला नकुळ केलें । राजेंद्रबाबूला सहदेव बोले ।
जो जो रे बाळा जो जो ॥ ८ ॥

हिंदी जनता ही द्रौपदी झाली । वनवासी ती दष्टीला पडली ।
शकुनि मामानें डावचि केला । म्हणे द्रौपदीला लावा पणाला ।
जो जो रे बाळा जो जो ॥ ९ ॥


पापी चांडाळ धांवुनि आला । नेसलें वस्त्र फेडूं लागला ।
धांवा कृष्णाचा होऊं लागला । चरखा सुदर्शन धांवुनी आला ।
जो जो रे बाळा जो जो ॥ १० ॥

मातृभूमीची दैना ही झाली । म्हणुन खादी ती जन्माला आली ।
लहानाची मोठी गांधीनें केली । लज्जा रक्षणा आपणा दिली ।
जो जो रे बाळा जो जो ॥ ११ ॥

शांति सत्यता अहिंसा व्रता । बहिष्कार हे घेऊनी शस्त्रा ।
सकराचा अवतार गांधींचा होई । हिंदी जनाला आनंद होई ।
जो जो रे बाळा जो जो ॥ १२ ॥

—कवि : हरिभाऊ भंडारे





# शाहीराचीं हकीगत

हे जनतारूपी जनार्दना,

अर्थात् माझ्या महाराष्ट्रीय समाजा, माझी लहान-मोठी प्रत्येक कृती मी तुझ्यासमोर गेलीं २५ वर्षें ठेवीत आलों आहे. तुला आणखी नव्यानें काय सांगूं ! तुला माहीत असेलच कीं—

माझा जन्म कोल्हापूर संस्थानांत पन्हाळा–पेट्यांतील किसरूळ या खेडेगांवीं १९०४ सालीं झाला. मी १९२१ सालीं मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झालों. पुणें इंजीनीयरिंग कॉलेजमध्यें शिकूं लागलों. पुढाऱ्यांचीं व्याख्यानें ऐकून पुढें शिकणें व नोकरीची चाकोरी धरणें या गोष्टी मनांतून काढून टाकल्या. इतक्यांत लग्नयोग घडून आला आणि संसाराची जबाबदारी अंगावर ओढवून घेतली. शिक्षण सोडलें व नोकरीही धरीत नाहीं म्हणून आप्तजनांनीं बोल लावले. त्यांचा विरोध मुकाट्यानें सहन केला. आणि अंगांत उपजत धुमसत असणाऱ्या कलांना फुंकर घालून उजाळा दिला व सार्वजनिक दृष्ट्या नकला करून व दांडपट्टा फिरवून मिळालेल्या पैशावर चरितार्थ चालू केला. प्रथम शाळा कॉलेजांच्या गॅदरींगमधून सुरवात झाली. मग गणपती उत्सवापुढें निमंत्रणें येऊं लागली. बिदागीची रक्कम पांच रुपयांपासून वीस पंचवीस रुपयांपर्यंत चढत गेली.

**म्हणोनि रचल्या नकला कविता या उद्देशानें ।**
**पुण्यांत गणपति उत्सव घुमले माझ्या कवनानें ॥**

पुण्यांत ग्रँट मेडिकल कॉलेजच्या संमेलनप्रसंगीं माझ्या एका मित्रानें मला मुंबईला नेलें. त्यायोगें परिचय वाढून मुंबईला गणेश उत्सवासाठीं निमंत्रणें येऊं लागलीं. मीही मग बुद्धि चालवून नवीन नवीन नकला रचूं लागलों व लोकप्रियता कायम ठेवली.

**माझ्या नकला पसंत पडल्या सुसभ्य रसिकांना ।**
**सोबत पट्टा फिरवुनी माझा राखिला मी बाणा ॥**
**त्यांतुन उठली आव्हानें मज लाठी–बहाद्दरांचीं ।**
**यशस्वी ठरलों मी कामाठीपुरा साक्ष त्याची ॥**

कामाठीपुऱ्यांत माझ्या श्री. पुप्पाला या शिष्यानें ३०० लोकांना लाठी फिरवून पळवून लावलें व गल्लीचें रक्षण केलें ही गोष्ट सर्वांच्या परीचयाची आहे. त्यानंतर चाळी–चाळींतून मी लाठीचे वर्ग काढले. रत्नागिरी, कराड, इचलकरंजी, औंध, महाड, ओगलेवाडी इ० शहरीं नागरिकांच्या निमंत्रणावरून जाऊन अनेक महिने राहून दांडपट्ट्याचें शिक्षण स्त्रीपुरुषांना दिलें. सारांश सुमारें १ तपपर्यंत हाच माझा मुख्य विषय होऊन बसला. पण क्षमा करा. मी शाहीरीबद्दल बोलावयाचें सोडून भलतीकडे चाललों. आतां आवरतोंच. फक्त एकच वाक्य! स्काऊट जांबोरीचें निमित्त सांगून पास–पोर्ट मिळवून परदेशांत हंगेरी व इंग्लंडला गेलों. तेथें राज्यकर्त्या इंग्रजांसमोर निधड्या छातीनें लंडनमधील वेवर्स डग्लस थिएटरमध्यें हिंदी दांडपट्टा, तलवार व लाठीचे प्रयोग दाखवण्याचें धाडस केलें. इतकेंच काय पण तेथें जपानी स्टिक फायटींग चँपियनबरोबर फ्रेंडली सामना देऊन आमचें वैशिष्ट्य पटविलें. आणि हा सारा खटाटोप केवळ खऱ्या कलेच्या संशोधक तळमळीमुळें घडून आला. एक पैचाही फायदा झाला नाहीं. पदरच्या खर्चानें पै पै मिळवून गेलो नि आलों. आतां शाहीरीसंबंधी :—

शाहीर या शब्दाची व्युत्पत्ती व अर्थ काय हें अजून मला नीटसें कळलेलें नाहीं. पण माझी स्वतःची व्याख्या अशी कीं—जो स्वतः कवित्व रचतो व गांवोगांवीं जाऊन स्वतः गाऊन त्याचा प्रचार करतो तो शाहीर. अशा अर्थानें मी शाहीर कसा बनलों तें ऐका. एकदां मुंबईत ब्राह्मण सभेंत माझ्या नकला झाल्या. प्रोगाम संपल्यावर दोन सद्‌गृहस्थ माझेजवळ येऊन मोठ्या आदरानं मला विनवून सांगूं लागले कीं, "अहो नानिवडेकर, ढेकणाची शिकार ही पोवाड्याची नकल करून तुम्ही आपली प्रभावी प्रतिभा फुकट कां घालवीत आहांत ? तुम्ही यापुढें शाहीर बनाल तर मोठें राष्ट्रकार्य होईल." बस्स्, हीच त्यांची स्फूर्ति घेऊन मी जो उठलो तो अभ्यास करून पहिला "**रणशूर धन्य जगतांत** ।" हा झांशीच्या राणीचा पोवाडा रचला, व म्हणूं लागलों. लवकरच सुधारणेची दिशाभूल हा पोवाडा त्यांत भरीला येऊन पडला. तुणतुणें—डफ कुठें मिळेना. प्रथम ब्रुकबॉंडच्या चहाच्या डबड्याचें तुणतुणें बनवलें व डफ मागून आणला. नंतर स्वतःच बनवायला शिकलों. पोवाड्याच्या चाली व डफ वाजवण्याची व मागें झील धरण्याची सुटसुटीत शाळा कांहीं केल्या मला स्वस्थ बसूं देईना. ह्या गोंधळ्याला भेट, त्याला रंगांत आण, त्याचें भारुड भाराभर ऐक, तेव्हां कुठं त्यांतून उपयुक्त एकदा कण मिळायचा. तें संपलें कीं रस्त्यावरचे वाघे लोक शोधून आण, तें संपलें की दांगट, भराडी, कोल्हाटी व शेवटीं कढ्याढोलगी, म्हार, मांग, तमासगीर यांचा पिच्छा मी धरला. तेव्हां कुठं मला ह्या पोवाड्यांच्या चालींचा उगम सांपडला, व मनाला हायसें वाटलें. खड्या मस्त चाली जर कुठं असतील तर त्या केवळ म्हारामांगांच्या तमाशांतच, अशी माझी खात्री झाली आणि मग मी प्रत्येक ढोलगीचा तमाशा न चुकतां पाहूं लागलों. त्यांतून माझ्या बुद्धीप्रमाणें व शक्तीप्रमाणें चाली उचलल्या व वाजपाचे आडाखे लक्ष्यांत घेतले.

## शाहिरी कला उच्चपदीं चढविली—

१९३० सालच्या मडगांवच्या साहित्यसंमेलनांत माझा झांशीच्या राणीचा पोवाडा जो एकदां विद्वानांना रुचला तो साहित्यसंमेलनांत रात्रौ काव्यगायनांत पोवाड्याविना रंग भरेनासा झाला. त्यानंतर साहित्यसंमेलनाच्या खास निमंत्रणावरून मी सोलापूर, इंदूर, हैद्राबाद, विजापूर, रत्नागिरी या शहरीं शाहिरी गाजविली.

## शाहिरीचा उगम तमाशांत—

शाहिरी काव्य विद्वानांच्या पचनीं पाडतां पाडतां प्रतिदिनीं नव्या नव्या चाली, म्हारामांगांकडून शिकून घेण्यांत मी कसूर केली नाहीं. त्यामुळें पोवाड्यांच्या जोडीला मी तमाशाच्या थाटावर प्रहसनें-वग रचूं लागलों, व माझे सारेच्या सारे वग आज मराठी क्षेत्रांत महशूर असेच आहेत. उदाहरणार्थ किसरूळचा शेतकरी म्हणतो– **"लिवनाऱ्याची सारी कारवाई-गोरगरिवांचा वाली कोणी नाहीं रे नाहीं-कवि महादेवाचे वोल, नका मानूं कवडी मोल, एवढी विनंति शाहीराची हाईरे हाई, शिकल्यावांचून धडगत नाहीं रे नाहीं"** (२) वसाडगांवचा जमिनदार म्हणतो–**"आम्ही हवें तसें करणार, धोंड्या कोण अम्हां पुसणार"** (३) पुस्तकी शिक्षण म्हणतें–**" शात भात विकलं, प्वार शिकिवलं, खेड्याचं हित केलं काइ, हें शिक्षान नग ग वाई"** (४) खेडें शहर म्हणतें–**" शहरांत मौज भारी, वाई खेडेंच सौख्यकारी "** (५) मोटार प्रवास म्हणतो—**" मोटार अड्यावरी हा एजंट मालक वनला "** इ० इ० इ०

**" खुशाल घ्या तुम्ही झाडा माझ्या काव्यसंग्रहाचा ।**
**मास्टर व्हॉइस तवकडि आंकडा सहज शंभराचा ॥**

## साहित्य-संमेलनांत लावण्या—

मुंबई सा. सं. चें आव्हान स्वीकारून जुन्या लावण्या म्हणणारा एक वीर मजवांचून पुढें आला नाहीं. मीच गळ्यांत ढोलकें अडकवून **(१) कोण्या ग सुभगाची मदन मंजरी (२) सुंदरा मनामधें भरली (३) दुमदार कोणाची छान (४) लष्करचं काय सुख,** या परशराम जोश्यांच्या लावण्या गाऊन रूढ केल्या.

## साहित्य-संमेलनांत प्रत्यक्ष तमाशा—

पुन्हा त्याच मुंबईंत प्रभावी नाट्यसंमेलन आचार्य अत्रे यांचे अध्यक्षतेखालीं झालें त्यावेळीं माझेवर प्रत्यक्ष तमाशा दाखवणेची अवघड कामगिरी सोंपविण्यांत आली, व ती मी प्रसिद्ध राधाबाई बुधगांवकर यांच्या ताफ्यांत मिसळून साडेतीन तास अस्सल जुन्या परंपरेचा तमाशा करून दाखविली. आगाऊ जाहीर केल्याप्रमाणें संपूर्ण कार्यक्रम कोठेंही असभ्य होऊं न देण्याची सारी जबाबदारी केवळ माझ्यावर सोंपवली होती व ती मी घेतली होती. माझेवर विश्वासून हजारों स्त्रिया त्या दिवशीं मुद्दाम तिकिटें काढून आल्या होत्या. खेळ पाहून बहुतेक पत्रांतून तमाशा कलेची वाहवा झाली होती.

## रेडिओंत तमाशा—

कवि अनंतफंदीच्या जीवन-चरित्रावर वग लिहून तो जोडीला भाऊ मांग नारायणगांवकरांची पटाईत ढोलकी हलगी वाजवणारी मंडळी घेऊन रेडिओच्या स्टूडिओंत दणका उडवून दिला व वग शब्द रेडिओंत रूढ केला.

## [ १ ] माझे गुरु कोण ?

काव्य करण्याची प्रतिभा मूळ उपजतच व पुढें कोल्हापूरचे लहरी हैदर कवि. गाण्यांत व वाजवण्यांत प्रथम श्री. वामनराव पाध्ये गवई

कोल्हापूर व नंतर किसरूळ गांवच्या दाजी म्हारांपासून आजवर ऐकलेले सर्व कलावंत.

**[ २ ] कलगी तुरा म्हणजे काय ?**

मला तरी अजून कळलेलें नाहीं. तो फार मोठा सागर आहे म्हणतात. पण मी खेड्यांत इतका मिसळूनही व त्याच्या मागें लागूनसुद्धां सवाल-जबाब ही काय चीज आहे हें ऐकण्याचें भाग्य माझ्या वांट्याला आलेलें नाहीं.

**[ ३ ] पोवाड्यांच्या चाली एकंदर आहेत तरी किती ?**

त्यांचें अजून कोणा विद्वानानें नोटेशन केलेलें नाहीं. कोणी करणारा भेटल्यास मी सहाय्य देईन.

**[ ४ ] राष्ट्रीय शाहीर म्हणजे काय व त्याचें जीवन कसें असावें:—**

एकदां वर्तमानपत्रांतून टीका आली होती—"हल्लींचे शाहीर लोकजागृती न करतां केवळ जनरंजनच करीत सुटले आहेत." आतां या वर्तमानपत्रकारांना मी काय म्हणूं ? अहो महाशय, ज्यावेळीं पेशव्यासरी वर्तमानपत्रं नव्हती, तारा नव्हत्या, रेडिओ नव्हता, फोनो नव्हता, त्यावेळीं शाहीर गांवोगांवीं हिंडून लोकजागृती करीत, हें मान्य आहे. पण आतां, ह्या क्षणाक्षणाला बदलणाऱ्या जगांत रोज नवनवीन काव्यें रचून, तीं तोंडपाठ करून, समाजापुढें गाऊन दाखविण्याचा वेडेपणा कोण करील ? आणि पोवाड्यांत रंजनाचा भाग जर नसेल तर समाज उभा तरी राहील कशाला ! व्याख्यान एवढें तुमचें महत्वाचें ना ? मग माणसें जमवायला आधीं पोवाडे-वाल्याला कां उभा करतां ? आणि शाहीराची तुम्ही अंतर्बाह्य कधीं पुरेपूर चौकशी केली आहे काय ?

**" कवी कुठें जन्मतो, राहतो पितो काय खातो ।**
**केवळ लौकिक वायु भक्षुनी कोण कधीं जगतो ॥**

म्हणे शाहीरानें निस्वार्थीपणानें लोकजागृतीचें कार्य करावें. अहो त्याला पोटाला नको ? त्याला संसार नाहीं ?

कवी आपुलें कुटुंब सांगा कैसें पोशील ?
बिदागी त्या पन्नास वाटले फार काय मोल ?

अथवा असें कशाला ?

जनतारूपी जनार्दनासी प्रथम करूनी मुजरा।
महादेव करी प्रश्न रोकडा सर्व पत्रकारां ॥
शाहीरांवरि टीका करितां सैल लेखणीनें।
असें करावें तसें करूं नये देतां व्याख्यानें ॥
शाहीरांचें कार्य तपासा आधीं पुरेपूर।
त्याच्यासंगें प्रवास करुनी फिरा रात्रभर ॥
स्वतः रचावें पठण करावें सभेंत तें गावें।
पुन्हां रचावें सभेंत गावें लोकप्रिय व्हावें।
असा काव्यसंभार स्वतःचा धरुनी तोंडांत।
शाहीर उठवी रानें त्याच्या देतां तोंडांत।
पेटी तबला डफ तुणतुणें कोठुन जमवीतो।
जोडीदारां बिदागी कोठुन कैसी पुरवीतो।
ताल सुरावर डफ हलगीचे बोल शिकायाला।
जाई कोणत्या शाळेमध्यें सूज्ञ स्पष्ट बोला।
शास्त्रशुद्ध काव्याची रचना कशी त्यास ठावी
अद्यावत जगताची माहिती कोण त्यास पुरवी।

किति शाहीर अट्टल चोर
मिरविती प्रोफेसर।
दुसऱ्याचें कवन गाणार।

अन्य कवीचें काव्य चोरुनी गाती बैठकीला।
अशा कवींचा खुशाल चाले जगीं बोलबाला ॥
शाहीर गाणार, स्वतः रचणार, बहुश्रुत शाहणा असावा।
मिशा चढविणार घसा खरडणार डफ फोडणार नसावा ॥

किति सांगु माझी मी कहाणी
म्हणूं नका असत्य कोणी
प्रापंचिक गरिबी रहाणी
प्रवासांत धनाची हानी
झिजविलें शरिर जागृणीं।

आत्मप्रौढि नच हृद्गत कथिलें निरुपायें तुजला।
जनतारूपी न्याय देवते प्रसन्न हो मजला॥
शेवटीं एकच विनंति करतों नी क्षमा मागतों।
सर्वांगी शाहिरी परीक्षा कधीं घेतां बोला।
केल्या कार्याबद्दल बक्षिस काय द्याल बोला।
अपराध्यासी दंड कोणता तोही स्पष्ट बोला।
बोला बोला पण बोला तुम्ही नका राहूं शांत।
अनुल्लेख जें तुमचें अस्त्र आणा प्रकाशांत॥

तुमचाच
—शाहीर नानिवडेकर

★


शाहीर नानिवडेकर यांच्या नवीन

**नकला व लावण्या**

पृष्ठें ३२ : आकर्षक सजावट : मूल्य ४ आणे

# गांधींची आरती



जय, जय, जय, जय, गांधी मोहना। अमर महात्मा तूझी कीर्ती त्रिभुवना ॥ जय जय जय जय ॥ धृ० ॥


सुखवाया स्वजनां परदेशां गेला। पदवी बॅरिस्टर घेऊन आला॥ आफ्रीकेसी गेला धंदा करण्याला। तथें त्यागी वीर सत्याग्रहि बनला॥ माणुसकीचा दिधला मिळवूनी मान। म्हणोनी हिंदी जगती स्वाभीमानानं ॥ १ ॥

साबरमतीला केला आश्रम स्थापन। शांति-सैनिक लाखो केले निर्माण॥ सत्य अहिंसा ब्रीद करोनी पालन। सैनिक देती झुंजा प्राणहि अर्पून। हातीं ना घेतां तोफा बंदूका। निःशस्त्रानें दिधला साम्राज्या धक्का ॥ २ ॥

स्वातंत्र्याचे दिधले जनतेला पाठ। मिटवुनि जातिद्वेषां केली एकजूट॥ राष्ट्राचा झेंडा तिरंगी उभवीला। चाळीस कोटी हिंदी त्याखालीं आला॥ प्राणपणानें दिधला सत्याग्रहि मारा। म्हणोनि इंग्रजानें केला पोबारा ॥ ३ ॥

पंधरा ऑगस्ट सत्तेचाळीस। सोन्याचा दीन भारत मातेस॥ स्वातंत्र्य बाळ येई जन्मास। पुरली गांधी मोहनदासाची हौस॥ अमर महात्मा गांधी सुरलोकीं गेला। आरती महादेवाची त्याच्या आत्म्याला ॥ ४ ॥

या डफ आणि तुणतुण्यामुळें शाहीरांचे पोवाडे रंगतात !



स्क्रू पेंचाचें

तुणतुणें

१५ रु.

●

पेंचाचा डफ

३५ रु.


जयहिंद प्रकाशन : झावबाची वाडी मुंबई २

★ मुद्रक
जयराम दिपाजी देसाई
राष्ट्रवैभव प्रेस : मुंबई ४

★ प्रकाशक
गजानन काशीनाथ रायकर
झावबाची वाडी : मुंबई २

★ प्रथमावृत्ति
३० जानेवारी १९४९

★ पुनर्मुद्रण
१ जुलै १९४९

★ चित्रकार
रघुवीर मुळगांवकर : मुंबई ४


★